# मुख्य कार्यालय, विरार

विरार (प),

ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890

फॅक्स : 0250-2525107

ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


जावक क्र. : व.वि.श.म./ /

दि. १२ ऑक्टोबर २०२६

## वसई-विरार महानगरपालिकेची प्रतिबंधित प्लास्टिकविरोधी मोठी कारवाई; ४,२०० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त, १० हजार रुपयांचा दंड

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापर व साठवणुकी विरोधात महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान विरार पश्चिम येथील विराट नगर परिसरातील सुख सागर येथील प्रार्थना पॅकेजिंग या गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेले सुमारे ४,२०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच संबंधितांवर १०,०००/- रुपयांचा दंड आकारण्यात आला.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर, साठवणूक व विक्री यांना आळा घालण्यासाठी महानगरपालिकेमार्फत नियमितपणे तपासणी व कारवाई करण्यात येत आहे. नागरिक व व्यावसायिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सदर कारवाई  मा.उपायुक्त श्रीमती अर्चना दिवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहा. आयुक्त श्री. जितेंद्र नाईक, मुख्य आरोग्य निरीक्षक श्री. निलेश जाधव, स्वच्छता निरीक्षक श्री. संजय सावंत, श्री. प्रणित तेली, श्री. दुर्गेश ठसाळे तसेच संबंधित कर्मचारी वर्ग व सफाई कामगार उपस्थित होते.